2011051016400900l

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात
जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण
अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत
नवी मुंबई व नाशिक महानगरपालिकांना
निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. एनयुआर-२०१०/प्रक्र- २९९/नवि-३३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० मार्च,२०११

संदर्भ: १) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे आदेश एफ क्र.-५९ (१)/पीएफ-१/२०१०-१०७७,
दिनांक १४/०३/२०११
२) शासन निर्णय क्र. एनयुआरएम-१००७/३५६/प्र.क्र.७२/०७/नवि-३३, दिनांक १६ जुलै, २००७
३) शासन निर्णय,समक्रमांक, दिनांक २३फेब्रुवारी,२०११.

प्रस्तावना : नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेवून केंद्र शासनाने देशातील ६३ शहरांमध्ये पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम दिनांक ३ डिसेंबर,२००५ रोजी जाहीर केला आहे.

उक्त कार्यक्रमाअंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर शहर विकास आराखड्यासंबंधातील सविस्तर प्रकल्प अहवाल जे राज्यस्तरीय सुकाणु समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या अंतिम मंजूरीसाठी "नोडल एजन्सी" (MMRDA) मार्फत सादर करण्यात आले होते. त्यांस, केंद्र शासनाच्या केंद्रीय मंजूरी समितीने (Central Sanctioning Committee) ने मंजुरी दिली असून संदर्भाधिन क्र.१ व २ येथील केंद्र शासनाच्या आदेशान्वये अतिरिक्त रक्कम वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. सदर मंजुरीनुसार उक्त योजनेच्या (JNNURM) मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाच्या हिश्श्याच्या वितरीत रकमा व त्यानुसार राज्य शासनाच्या हिश्श्याच्या वितरित करावयाच्या रकमा यांचा तपशिल खालील तक्त्याप्रमाणे आहेत :-

(रुपये कोटीत)

अ. क्र.	शहर	प्रकल्प	केंद्राचा वितरीत हिस्सा	राज्य शासनाचा वितरीत करावयाचा हिस्सा
१	नवी मुंबई	ई-गव्हर्नन्स	१.३२	०.५७
२	नाशिक	भुयारी गटार टप्पा-२	२१.४८	८.५९
	एकूण			९.१६

शासन निर्णय :

केंद्र शासनाने वितरित केलेला हिस्सा वितरित करण्यात आला असून राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम रुपये नऊ कोटी, सोळा लाख, फक्त (रुपये ९,१६,००,०००/-) संबंधित महानगरपालिकेस वितरित करण्याचा

प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. सदर रकमांचे वितरण अनुदान म्हणून करण्यात येत आहे. त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार निधी वितरीत करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे आणि यासाठी **श्री. प्र.तु. सातकर, उपसचिव**, नगर विकास विभाग यांना **"नियंत्रण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे व **श्री.आर.रा. राजपूत**, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांना **"आहरण व संवितरण** अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी रुपये इतक्या रकमेचा धनादेश जेएनएनयुआरएम फंड ("JNNURM Fund") या नावाने काढावा व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (राज्यस्तरीय नोडल एजन्सी) सुपूर्द करावा. राज्यस्तरीय नोडल एजन्सीने सदर रकमांचे वितरण संबंधित महानगरपालिकेस तात्काळ करावे.

(रुपये कोटीत)

क्र.	शहर	प्रकल्प	केंद्राचा वितरीत हिस्सा	राज्य शासनाचा वितरीत करावयाचा हिस्सा
	नवी मुंबई	ई-गव्हर्नन्स	१.३२	०.५७
	नाशिक	भुयारी गटार टप्पा-२	२१.४८	८.५९
	एकूण			**९.१६**

सदर रक्कमांचे वितरण पहिल्या हप्त्यापोटी करण्यात येत आहे.

०२. संबंधित महानगरपालिकेने त्रिपक्षीय करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणांबाबत वर्षनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरित केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र दिल्यानंतरच सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाचा पुढील हिस्सा वितरित करण्यात येईल.

०३. केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष पाहणीद्वारे या योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा तसेच सुधारणा क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेण्यात येईल. संबंधित महानगरपालिकेने दर तीन महिन्यांनी राज्यस्तरीय नोडल एजन्सीमार्फत राज्य तसेच केंद्र शासनाच्या हिश्याच्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचा अहवाल राज्य शासन तसेच, केंद्र शासनास सादर करावा. अशाप्रकारे तिमाही अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास त्यांना पुढील हिस्सा प्रलंबित विनियोग अहवाल प्राप्त होईपर्यन्त वितरित करण्यात येणार नाही.

०४. प्रस्तुत योजनेअंतर्गत सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेमधून काय साध्य झाले याबाबतचा अहवाल महानगरपालिकेने राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावा.

०५. नवी मुंबई, व नाशिक महानगरपालिकेस देण्यात येणा-या रुपये नऊ कोटी, सोळा लाख, फक्त (रुपये ९,१६,००,०००/-) इतक्या रकमेचा खर्च हा मागणी क्र. एफ-२, २२१७, नगर विकास, १९१, महानगरपालिकांना सहाय्य (००) (१४) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत महानगरपालिकांसाठी नगर - विकासाकरीता सहाय्य (राज्य हिस्सा) (२२१७३२२१), ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-२०११ या चालू आर्थिक वर्षी मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

[illegible] सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक [illegible] दिनांक [illegible]/२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति --

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ , मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ , मुंबई
३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, सदर प्रकल्पाकरीता [illegible] प्रमाणपत्रे [illegible] शासन निर्णय ,समक्रमांक दिनांक ५ फेब्रुवारी,२०११ समवेत सादर केलेल्या आहेत त्यामुळे सध्याचे उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.
५) प्रधान सचिव, वित्त / प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महानगर आयुक्त तथा नोडल एजन्सी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,, मुंबई
७) आयुक्त, संबंधित महानगरपालिका
८) लेखशाखा, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) उप सचिव (नवि-३३) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
१०) सह सचिव (नवि-४) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
११) निवडनस्ती (नवि-३३).